Vol II Issue IV Oct 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidiciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 4, Oct 2012
ISSN:-2231-5063

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# ''क्रिडा क्षेत्रात पंचगिरीचे महत्व व तत्वे एक अभ्यास''

*मोरे राहुल नानासाहेब*

शारीरिक शिक्षण विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि) ता.कन्नड जि.औरंगाबाद

***सारांश :***

आधुनिक युगामध्ये धावपळीच्या या जगामध्ये माणुस आपला शारीरिक स्वास्थ हारवुन बसला आहे. शारिरीक स्वास्थ व्यवस्थित ठेवण्यासाठी व्यायाम, प्राणायाम तसेच खेळ महत्वाचे आहेत. खेळामुळे व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होतो. कॉम्प्युटर युगानंतर नक्कीच क्रीडा युग येईल. क्रिडा, खेळामध्ये योग्य निर्णय देण्यासाठी पंचाची गरज असते. पंचाशिवाय सामना, खेळ होऊ शकत नाही. कारण कोणतेही खेळाडू किंवा संघ अपयश सहजासहजी पचुशकणार नाही. किंवा हार मानणार नाही. यासाठी खेळामध्ये पंचाला अनन्यसाधारण महत्व आहे. क्रिडा क्षेत्रामध्ये पंचाचे स्थान महत्वाचे आहे. पंचाशिवाय सामनाच नाही. हे सत्य नाकारुन चालणार नाही. आज अनेक देशांमध्ये ऑल्मपिक स्पर्धा, विश्वकप, आशियाई स्पर्धा इत्यादी मध्ये पंचांनी दिलेले निर्णय योग्यच मानले जातात. यश व अपयश पचविण्याची ताकद पंचानि दिलेल्या निर्णयामुळे कोणत्यातरी एका संघाला येते. किंवा अपयश पचवावे लागते. अशा प्रकारे सर्वात मोठी कामगिरी पंचाला निभवावी लागते. म्हणून पंचाला महत्वाचे स्थान क्रिडा क्षेत्रात देण्यात येत आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये पंचाचे महत्व व त्यांचे तत्वे आपल्या लक्षात येतील.

## प्रस्तावना :(Introduction)

शारीरिक शिक्षणापासून आपण खेळ आणि स्पर्धा यांना वेगळे करु शकत नाही. स्पर्धा जाहीर झाली की त्यात अनेक संघ व स्पर्धक खेळण्यासाठी मैदानावर उतरतात किंवा त्या स्पर्धेत भाग घेतात. त्यांचा उद्‌देश एकच असतो की, ''आपण त्या खेळांच्या स्पर्धांमध्ये विजय संपादन करावा.'' परंतु स्पर्धा ह्या मानवाचा शारीरिक, बौध्दिक, मानसिक असा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी घेतल्या जातात. या स्पर्धेतून विजयी व उपविजयी संघ घोषित करावे लागतात. आपण कोणताही संघ पाहून त्या संघाचे कौशल्य चांगले आहे असे सांगु शकत नाही, किंवा तो संघ उत्तम आहे असे ठरवू शकत नाही. त्यासाठी आपणास दोन संघामध्ये सामना खेळवून जो संघ नियमानुसार उत्तम खेळत असेल व जो इतर संघांपेक्षा जास्त गुण मिळवून विजयी घोषित होईल त्यावरुन आपणास त्या संघाचे श्रेष्ठतव समजून येते.

म्हणूनच सामना खेळविणे यातूनच ''पंचगिरी'(Officiating) चा उदय होतो. प्रत्येक खेळाचे श्रेष्ठतव अनेक संघांतून ठरविण्यासाठी अधिकारी वर्ग (Official) लागतो किंवा त्यांची आवश्यकता असते. कोणताही खेळ खेळत असतांना त्यास अटी व नियम असतात व हे नियम व अटी त्या खेळाच्या संघटनेने (थ्मकमतंजपवद) तयार केलेले असतात. हे नियम त्या खेळास लागू केले जातात. नियमानुसार खेळ खेळला पाहिजे व अधिकाऱ्याने तो खेळविला पाहिजे. खेळाडूने त्या नियमाचे पालन केले पाहिजे. काही वेळेस अशी परिस्थिती निर्माण होते की, त्या खेळातील तज्ञ व्यक्तींनी त्यावेळेस निर्णय देऊन श्रेष्ठतव ठरवावयास पाहिजे. त्या क्रियेसच पंचगिरी(Officiating) असे म्हणतात.

''Officiating म्हणजे खेळात किंवा क्रीडा प्रकारात श्रेष्ठता ठरविणे.'' अशी सर्वसाधारण व्याख्या करता येईल.

''Officiating म्हणजे क्रीडा प्रकार व खेळात नियमानुसार खेळ खेळवून त्यामध्ये जी परिस्थिती निर्माण होते त्यावर निर्णय देणे व संघाची श्रेष्ठता ठरविणे होय.''

संघाची किंवा खेळाची किंवा खेळाडूची श्रेष्ठता जी व्यक्ती ठरविते त्या व्यक्तिस अधिकारी (Official) किंवा (Umpire) असे म्हणतात व त्या अधिकाऱ्याच्या कामास पंचगिरी(Officiating) असे म्हणतात.

स्पर्धेतून दोन खेळाडूंमध्ये किंवा दोन संघांमध्ये समानतेतून श्रेष्ठता सिध्द करावयाची असते. दोन्ही संघांजवळ समान खेळाडू, सारखे नियम, सारखे क्रीडांगण, सारखाच वेळ, सारखेच साहित्य असते आणि या समानतेतून गुणांच्या आधारावरुन श्रेष्ठता ठरवावयाची असते. जो संघ जास्त गुण मिळविल तो संघ त्या दोन संघांत श्रेष्ठ ठरविला जातो.

पंचगिरी(Officiating) मध्ये खेळाचे नियम, अटी, त्यात निर्माण होणारी परिस्थिती, शेवटचा निर्णय व मत ह्या सर्वांचा समावेश होतो. म्हणून पंचगिरी (Officiating) हा एक खेळाचाच भाग आहे असे मानले जाते.

## पंचगिरीच्या व्याख्या (Definitions of Officiating) :

1.खेळाच्या नियमानुसार तज्ञ व्यक्तींच्या खेळ खेळविण्याच्या क्रियेला 'पंचगिरी' 'Officiating' असे म्हणतात.
2.''सामना चालू असताना नियमानुसार योग्य निर्णय देऊन सामन्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवून खेळाची श्रेष्ठता ठरविणे म्हणजेच पंचगिरी

**Please cite this Article as :** *मोरे राहुल नानासाहेब* **,** *''क्रिडा क्षेत्रात पंचगिरीचे महत्व व तत्वे एक अभ्यास''* **: Golden Research Thoughts (Oct. ; 2012)**

(Officiating) होय.''
3.''नियमानुसार सामना व्यवस्थित पार पाडण्यासाठी घडलेल्या कृतीनुसार नियमांचे पालन करुन योग्य ते निर्णय देऊन सामना खेळविणे यास पंचगिरी (Officiating) असे म्हणतात.''

**पंचगिरीचे महत्व (Importance of Officiating)**

शारीरिक शिक्षणात सर्व प्रकारच्या खेळांचा व मनोरंजनाचा समावेश होतो. शारीरिक शिक्षणाचा उद्देश मानवाचा शारीरिक, मानसिक व बौध्दिक असा सर्वांगीण विकास करणे हा होय. हा उद्देश तेव्हाच पूर्ण होऊ शकतो जेव्हा त्या खेळांसाठी केलेली पंचगिरी ही निर्दोष असेल. म्हणूनच आज शारीरिक शिक्षण व खेळांमध्ये पंचगिरीला अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.

**1) समानतेतून श्रेष्ठता ठरविण्यासाठी :**

जेव्हा दोन खेळाडूंमध्ये किंवा संघांमध्ये स्पर्धा होत असते तेव्हा त्या दोन्ही खेळाडूंना किंवा संघांना समान संधी देऊन व समान नियम वापरुन त्या दोन्ही खेळाडू किंवा संघांमधून श्रेष्ठ कोण हे ठरविण्यासाठी पंचगिरी ही अत्यंत महत्वाची मानली जाते.

**2) खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी :**

खेळाचे श्रेष्ठतव टिकविण्यासाठी योग्य पंचगिरीची गरज असते. कोणत्याही खेळात त्या खेळाचे नियम व अटींचे योग्य रीतीने पालन करुन व समान संधी देऊन सामना खेळविणे आवश्यक असते. यावरच त्या खेळाचा दर्जा अवलंबून असतो. जर पंचगिरी ही उच्च प्रतीची व व्यवस्थित नसेल तर त्या खेळाचा दर्जा हा उच्च प्रतीचा राहू शकत नाही. म्हणून खेळाचा दर्जा उच्च प्रतीचा राखण्यासाठी योग्य पंचगिरीला अत्यंत महत्व आहे.

**3) प्रेक्षकांची आवड टिकविण्यासाठी :**

उच्च प्रतीचा खेळ किंवा स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षक नेहमीच उत्सुक असतात. उच्च प्रतीचा खेळ तेव्हाच होऊ शकतो जेव्हा त्या खेळाची पंचगिरी व्यवस्थित केली जाते. प्रेक्षक हा खेळातील अत्यंत महत्वाचा असा घटक आहे. योग्य पंचगिरीमुळे प्रेक्षक हा त्या खेळाकडे किंवा स्पर्धेकडे आकर्षित होत असतो. त्यांचे आकर्षण टिकवून ठेवण्यासाठी पंचगिरीला अत्यंत महत्व आहे.

**4) खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी :**

पंचगिरी ही योग्य दर्जाची होत असेल तर खेळाडू हा आपले कौशल्य योग्य रीतीने शेवटपर्यंत दाखवून सामना जिंकण्याचा प्रयत्न करत असतो. यातूनच त्याच्या खेळातील सर्व गुणांचे प्रेक्षकांना दर्शन होत असते. त्याला त्याच्या खेळात झालेल्या चुका ह्या समजून येतात व तो त्या चुका दूर करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे त्याच्या खेळाचा स्तर वाढत जातो. त्याच्या ज्ञानात व खिलाडूवृत्तीतही वाढ होत असते. तसेच त्याचा नावलौकिक होऊन प्रसिध्दी मिळत असते. म्हणजेच खेळाडूंचा सर्वांगीण विकास हा योग्य पंचगिरीवरच अवलंबून असतो.

**5) शारीरिक शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी :**

शारीरिक शिक्षणाचा उद्देश ''व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हा होय'' योग्य पंचगिरीमुळे विविध खेळांचा व खेळाडूंचा स्तर हा वाढत असतो. त्याच बरोबर खेळाडूंचा शारीरिक, मानसिक, बौध्दिक, आर्थिक, चारित्रिक व सामाजिक विकास म्हणजेच थोडक्यात त्याचा सर्वांगीण विकास होत असतो. खेळ व स्पर्धांमध्ये खेळाडूंचे व प्रेक्षकांचे मनोरंजनही होत असते. म्हणजेच शारीरिक शिक्षणाचे उद्दिष्ट उत्तम दर्जाच्या पंचगिरीवरच अवलंबून असते.

**पंचगिरीची मूलभूत तत्वे (Basic Principles of Officiating)**

कोणतेही कार्य यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी काही विशिष्ट तत्वांचा किंवा नियमांचा विचार करावा लागतो. पंचगिरीचा उद्देश उत्साही वातावरणात खेळ किंवा स्पर्धा पार पाडणे हा होय. पंचगिरी व्यवस्थित पार पाडण्यासाठी काही विशिष्ट तत्वांचा विचार करावा लागतो व त्या तत्वांना अनुसरुनच पंचाने वर्तन केले पाहिजे. थोडक्यात पंचगिरीची मूलभूत तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

**1) नियमांचे ज्ञान(Knowledge of Rulè) :**

खेळात पंचगिरी (Officiating) करणाऱ्या व्यक्तीस तो ज्या खेळाची पंचगिरी करीत आहे त्या खेळाची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. प्रत्येक खेळाच्या नियम व अटी ठरवून दिलेल्या असतात. त्याचे ज्ञान पंचाला असणे आवश्यक आहे. त्यामुळे सामना अधिकाऱ्यास निर्णय योग्य व त्वरित देता येतो. तसेच खेळाडूंवर अन्याय होत नाही. तो एखाद्या खेळाडूला शिक्षा करु शकतो जेव्हा त्याला त्या खेळाच्या नियमांचे सखोल ज्ञान असते.

**2) इशाऱ्यांचा वापर (Use of Singal) :**

खेळात अनेक प्रकारच्या स्थिती निर्माण होत असतात. उदा. फाऊल्स, टाईम आऊट, पॉईंट देणे, सामना सुरु करणे, सामना संपविणे इत्यादी निर्माण झालेली स्थिती खेळाडू, प्रेक्षक, इतर अधिकारी यांना समजण्यास इशाऱ्यांचा (Signal) वापर केला जातो. या इशाऱ्यांचे किंवा चिन्हांचे ज्ञान व वेळेवर वापर करण्याची क्षमता त्या सामना अधिकाऱ्यात असणे आवश्यक असते. यामुळे खेळात किंवा सामन्यात अडथळे निर्माण होत नाहीत व खेळ योग्य रीतीने पूर्ण होण्यास मदत होते.

### 4) खेळाचे जवळून निरीक्षण (Observation)

योग्य व त्वरित निर्णय देण्यासाठी पंचगिरी करीत असताना खेळातील प्रत्येक स्थितीचे जवळून निरीक्षण करणे आवश्यक असते. सामना चालू असताना सामना अधिकाऱ्याला खेळाडूबरोबर हालचाल करुन घडलेले प्रमाद पाहून त्यानुसार योग्य तो अचूक निर्णय देणे आवश्यक असते.

### 5) नियमानुसार निर्णय (Decision According to Rulè) :

खेळात निर्णय देत असताना पंचाने आपल्या कल्पनेने किंवा गृहित धरुन निर्णय देऊ नये. खेळाडू खेळत असताना त्याची क्रिया पूर्ण झाल्यावरच निर्णय द्यावा. निर्णय देत असताना नियमानुसारच निर्णय द्यावा. यामुळे खेळ व्यवस्थित नियमानुसार खेळला जाऊन कोणत्याही खेळाडूवर व संघावर अन्याय होणार नाही व स्पर्धा ह्या उत्तम प्रकारे पार पडतील.

### 6) कार्याची विभागणी (Distribution of Work) :

कोणत्याही खेळामध्ये एकच सामना अधिकारी योग्य रितीने आपले कार्य पूर्ण करु शकत नाही. त्यासाठी त्याला इतर सहाय्यक पंचांची मदत घ्यावी लागते. उदाः रेखापंच, गुणलेखक, वेळाधिकारी इत्यादी. तसेच कोणता अधिकारी कोणते कार्य करील याची जाणीव त्याला सामना सुरु होण्याआधी करुन दिली गेली पाहिजे. कारण सामना चालू असताना प्रत्येक अधिकाऱ्याला जबाबदाऱ्या ह्या वेगवेगळ्या असतात व त्यानुसारच ते आपले कार्य करतात. या कार्याच्या विभागाणीमुळे पंचगिरीचे कार्य योग्य रीतीने होण्यास मदत होते.

### 7) आवश्यक त्या ठिकाणी शिट्टीचा वापर (Use of Whistle) :

काही खेळांची पंचगिरी करताना शिट्टीचा वापर अत्यंत आवश्यक असतो. उदाः कबड्डी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, खो–खो, हॅन्डबॉल इत्यादी. सामना चालू असताना खेळाडूंचे प्रमाद लक्षात आणून देण्यासाठी व इतर अधिकाऱ्यांना शिट्टी वाजविण्याचे तंत्र सामना अधिकाऱ्यास अवगत असणे आवश्यक असते. खेळामध्ये घडलेल्या प्रमादानुसार ठराविक पध्दतीने शिट्टी वाजवून निर्णय घ्यावा लागतो. उदाः हॉकीमध्ये गोल झाल्यास लांब शिट्टी (Long Whistle) वाजवली जाते व फाऊल झाल्यास लहान शिट्टी वाजविली जाते.

### 8) सौजन्य (Courtesy) :

प्चगिरी करीत असताना सामना अधिकाऱ्याला संबंध हा खेळाडूंशी येत असतो. खेळाडूंच्या अडचणी सोडवताना सौजन्य दाखविणे हे पंचाचे कर्तव्यच असते. जर पंचांनी खेळाडूंना सौजन्यपूर्वक वागणूक दिली तर पंचांबद्दल आदराची भावना खेळाडूंच्या मनात निमार्ण होते. त्यामुळे खेळ खेळविण्यात पंचांना, कोणतीच अडचण निर्माण होत नाही. म्हणून पंचांमध्ये सौजन्य हा गुण असणे आवश्यक असते.

### 9) खंबीरपणा (Firmness)

सामना खेळवित असताना त्यात घडलेल्या प्रमादाबद्दल जे निर्णय अधिकाऱ्याला द्यावयाचे असतात ते योग्य व नियमानुसार दिले गेले पाहिजेत. हे निर्णय देत असतांना अधिकाऱ्यात खंबीरपणा व आत्मविश्वास हे दोन गुण असणे आवश्यक आहे. साधारणपणे दिलेल्या निर्णयात कोणत्याही प्रकारचे बदल करु नयेत.

### 10) खेळाविषयी सखोल ज्ञान(Deep knowledge of Game)

पंचगिरी करणाऱ्या व्यक्तीस खेळाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक असते. कारण खेळात अनेक गुंतागुंतीचे प्रसंग व स्थिती निर्माण होत असते. त्याची सर्व कल्पना किंवा त्याचे सर्व सखोल ज्ञान पंचांना असणे आवश्यक असते. खेळाडू खेळ खेळताना खेळांच्या नियमांचे व अटींचे पालन करतात किंवा नाही हे पाहण्यासाठी खेळाचे सखोल ज्ञान असणे महत्वाचे आहे.

### 11) नियमांचा कायदेशीर वापर (Use of Rules According to L)

सामना अधिकाऱ्याने सामना खेळवते समयी उद्भवणाऱ्या विविध परिस्थितीत कमीत कमी व्यत्यय किंवा अडथळा आणून नियमांचा कायदेशीर वापर करुन निर्णय द्यावा. ज्यामुळे सामन्यांची चुरस व लयबध्दता कायम राहील.

### निष्कर्ष :

प्रस्तुत अभ्यासामध्ये क्रिडा क्षेत्रात पंचगिरीचे महत्व व तत्वाचा अभ्यास केला आहे. क्रिडा क्षेत्रात पंचाला महत्वाचे स्थान आहे. खेळामध्ये योग्य निर्णय देणे हे महत्वाचे काम पंचाचे आहे. पंचाशिवाय खेळ नाही. यश–अपयश कोणाचे हा निर्णय देण्याचे काम पंचाचे आहे. पंचाशिवाय इतरांनी दिलेले निर्णय कोणताच खेळाडू किंवा संघ मान्य करणार नाही. यासाठी पंचाची कामगीरी महत्वाची आहे. म्हणून पंचाला क्रिडा क्षेत्रात महत्वाचे स्थान दिले आहे. प्रस्तुत अभ्यासात स्पष्ट केलेले काही तत्वे पंचानी अंगीकारले पाहिजे. हे तत्वे, गुण पंचाच्या अंगी असतील तर तो पंच निर्णय देण्यास योग्य मानले जाते. पंचाशिवाय सामना, खेळ नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

कादरी एस. जे. (2012), ''किडा मानसशास्त्र,''लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.
जर्दे श्रीपाद. (1995), ''शारीरिक शिक्षणाचा इतिहास'' चंद्रमा प्रकाशन, कोल्हापूर–3.
वाखारकर, दि. गो.(1973), ''महाराष्ट्रातील शा.शिक्षणाची वाटचाल,'' मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, औरंगाबाद.
पाटील, हिराजी. (1968), शारीरिक शिक्षण तत्वे व व्यवस्था श्री लेखन वाचन भांडार, पुणे.
सिलेदार, परिहार. (2000), ''खेळ संचालन व किडा मार्गदर्शन, ''अभय प्रकाशन, नांदेड 431605.
Sangral and Kamlesh : " principles and History of Physical Eduction," parkash Brathers, Ludhiyana.
Hackensimth, C.W. (1965), " Histroy of Physical Education," Harper and Row publishers, New York.
Lee (1969), "A Brief Histroy of Phy. Education", the Ronald press com. New York.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net